# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४

विषय–जून–जुलै २०२५ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षा वेळापत्रकाबाबत

## ।। प्र क ट न ।।

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत जून–जुलै २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) पुरवणी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | तपशिल | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा कालावधी (सर्वसाधारण, व्दिलक्षी व व्यवसाय अभ्यासक्रम तसेच माहिती तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांची ऑनलाईन परीक्षा) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | लेखी परीक्षा | मंगळवार, दि. २४ जून, २०२५ ते बुधवार, दि. १६ जुलै, २०२५ | मंगळवार, दि. २४ जून, २०२५ ते मंगळवार, दि. ०८ जुलै, २०२५ |
| २. | प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच **NSQF** अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा | मंगळवार, दि. २४ जून, २०२५ ते शुक्रवार, दि. ११ जुलै, २०२५ (माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षेसह) | मंगळवार, दि. २४ जून, २०२५ ते मंगळवार, दि. ०८ जुलै, २०२५ |
| ३. | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा (इ.१०वी) | ............ | मंगळवार, दि. २४ जून, २०२५ ते शुक्रवार, दि. ०४ जुलै, २०२५ |

तसेच इ.१२वी माहिती तंत्रज्ञान, सामान्यज्ञान विषयाची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने दि. १५.०७.२०२५ व दि. १६.०७.२०२५ रोजी घेण्यात येणार आहे

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर दि.२२/०५/२०२५ पासून उपलब्ध करून देण्यात येत आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २२.०५.२०२५

(देविदास कुलाळ)
सचिव,

क्र. कोविमं/डीपी/२०२५/परीक्षा/1991.
दिनांक:२२/०५/२०२५

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
सातारा / सांगली / कोल्हापूर

सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की,जून-जुलै २०२५च्या इ.१०वी व इ.१२वी पुरवणी परीक्षा वेळापत्रकाचे प्रकटन विद्यार्थी व पालक यांचे निदर्शनास आणून देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर